## पहिली खबर

0154216

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र State, जिल्हा मुंबई District, पोलीस ठाणे ला.प्र.वि. मुंबई Police Station, पहिली खबर क्र. ०८ FIR No., वर्ष २०२२ Year, दिनांक १८/०२/२०२२ Date

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधि. १९८८ कलमे Sections ७
   (ii) अधिनियम Act ............ कलमे Sections ............
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ............

3. (a) अपराधाची घटना : वार बुधवार Occurrence of offence : Day, तारीख पासून १६/०२/२२ Date from, वेळ १२:३० Time, तारीख पर्यंत १७/०२/२२ Date to, वेळ १६:३० दरम्यान Time

   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion)
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00

   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख १८/०२/२०२२ Date, वेळ १२:३० Time

   (c) गुन्हा दाखल झालेल्या सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. ०३/२२ General Diary Reference : Entry No., तारीख १८/०२/२२ Date, वेळ ०४:३० Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ............, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ............
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव शिधा वाटप कार्यालय क्र ३५ ई, ठिकाणाचे नंबर No. if any, गल्ली ............, रस्त्याचे नाव ............ Name of Road
   Address of Occurrence Name
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ............ गाव Village ............ पोस्ट Post ............ तालुका Taluka मुलुंड (प), जिल्हा मुंबई, राज्य State ४०००८०
   Nearest identifiable place
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव ............, तालुका Taluka ............, जिल्हा Dist. ............, राज्य State ............
   In case, outside the limit of this Police Station

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name विशाल गगात्रा
   (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name किशोर गगात्रा
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ३५ वर्षे
   (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय, फोन नं. Phone No. ८६९८६९८६३३
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ............, दिल्याचा दिनांक Date of Issue ............, दिल्याचे ठिकाण Place of Issue ............
   (f) व्यवसाय Occupation रेशनिंग दुकान
   (g) धर्म Religion ............, जात Caste ............, जनजात Sub-Caste ............
   (h) पत्ता Address ६०४, गल्ली / सर्व्हे नं. Ward ............, घर / नाव नं. House Name No. मानिषा गार्डन, नवघर रोड, फोन / मो. नं. Phone Mo. No. ............, पॅन नं. PAN ............ मुलुंड (पूर्व), वोटर्स नं. Card No. ............
   रस्त्याचे नाव Road मुंबई - ४०००८१, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ............, गाव Village ............, पोस्ट Post ............, पो. स्टे. P. Stn. ............
   तालुका Taluka मुंबई, जिल्हा Dist. मुंबई, राज्य State महाराष्ट्र, सध्याचा पत्ता Present Address ............

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of Known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

   श्री चंद्रशेखर जगन्नाथ भोंडे, वय - ५३ वर्षे, धंदा - नोकरी, पद - सहा. शिधा वाटप अधिकारी (वर्ग - ३), नेमणूक - शिधावाटप कार्यालय क्र ३५ ई, मुलुंड, सरोजिनी नायडू रोड, मुलुंड (प) मुंबई. रा. डी - अॅव्हेन्यू कॉ. ऑ. हौ. सोसायटी रूम नं B-206 सेक्टर - ५, घणसोली, नवी मुंबई. मो. नं. 8286567489

खालील फिर्यादि विशाल किशोर गणात्रा वय 35 वर्षे, रा.बी.704, मनिषा गार्डन, नवघर रोड, मुलुंड (पूर्व), मुंबई-८१ यांचा स्वतंत्र कागदावर नोंदविण्यात आलेला जबाब हाच गुन्ह्याची प्रथम खबर म्हणून घेण्यात येत आहे.

समक्ष

(गायत्री जाधव)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
वरळी, मुंबई.

(विशाल किशोर गणात्रा)

फिर्यादी दिनांक १७/०२/२०२२

श्री. विशाल किशोर गणात्रा, वय ३५ वर्षे, धंदा— रेशनिंगचे दुकान, रा.ठि. फ्लॅट नं. ७०४, मनिषा गार्डन, नवघर रोड, मुलूंड पुर्व, मुंबई —८१, मो.क्र.८३६९७९१२५४, ९६१९६१९६३३, आधारकार्ड क्र. ८६७२८७६४४३६२.

मी वरीलप्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर मागील ०८ वर्षापासुन माझी पत्नी प्रिया गणात्रा, वय ३२ वर्ष व मुलगी कु. क्रिया गणात्रा, वय ११ वर्ष असे कुटुंबासह रहात आहे.

मी मिलन स्टोअर्स नावाचे सरकारी शिधावाटप दुकान मागील १५ वर्षापासुन चालवित असुन नमुद दुकानाचे लायसन श्री. प्रविण बोरीचा यांचे नावाने आहे. सदर सरकारी शिधावाटप दुकान अ.शि.वा.दु.क्र. ३५ ई ४४ व एन २१, पत्ता— ६ वेती हाऊस, एल.टी. रोड, मुलूंड पुर्व, मुंबई ८१ येथे आहे.

आमच्या विभागतील कार्यरत असणारे लोकसेवक सहाय्यक शिधावाटप तपासणी अधिकारी श्री. चंद्रशेखर लोंढे हे माझ्या दुकानात वरचेवर येवुन माझे शिधा वाटप दुकानाची पाहणी करून सारखे म्हणत असतात की, ' तुझ्या दुकानमध्ये काळा बाजार करून धान्य विक्री केली जाते, याबाबत माझेकडे तक्रार आलेली आहे आणि त्या तक्रारीवरून मी तुझ्याविरूध्द गुन्हा दाखल करू शकतो. जर तुझ्यावर गुन्हा दाखल करून घ्यावयाचा नसेल तर तु मला प्रति महिना रू. ४०००/— इतका हफ्ता दे. यावर मी त्यांना मला हे शक्य होणार नाही असे सांगितले असता, त्यांना माझ्या बोलण्याचा राग आला व ते माझे दुकानातुन निघुन गेले. दिनांक ०२/०१/२०२२ रोजी त्यांनी माझे दुकानाची तपासणी केली, परंतु कुठलाही दोष आढळुन आला नाही. दिनांक ०३/०१/२०२२ रोजी माझे दुकानात असलेले धान्य हे शासनाकडुन दारिद्रय रेषेखाली असलेल्या लोंकाना देण्याकरीता असलेले धान्य हे लोंकापर्यत पोहचते किंवा नाही यांची चौकशी करायला त्यांनी ५० लोंकाच्या घरी जावुन पडताळणी केली व त्यात अपहार काढुन माझेविरूध्द नवघर पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. ०२/२०२२ कलम ४०९, ४२०,३४ भा.द.वि सह ३,७,८ जिवनावश्यक वस्तु अधिनियम १९५५ प्रमाणे गुन्हा दाखल केला.

दिनांक ३१/०१/२०२२ रोजी लोकसेवक श्री. लोंढे यांनी मला फोन करून बोलावुन घेतले व म्हणाले की, तु अपील करून दुकान चालु करून घे, मी तुझी मदत करतो, पण हया कामाकरीता मला मागे सांगितलेला हफ्ता प्रमाणे सप्टेंबर ते जानेवारी या पाच महिन्याचे प्रत्येकी रू.४०००/— प्रमाणे एकुण रू.२०,०००/— दयावे लागतील.

परंतु मला लोकसेवक सहा. शिधावाटप अधिकारी श्री. चंद्रशेखर लोंढे यांना लाच देण्याची इच्छा नसल्यामुळे दिनांक १६/०२/२०२२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, वरळी, मुंबई येथे तक्रार देण्याकरीता आलो. तेथे आल्यानंतर माझी तक्रार वरिष्ठांना सांगितली व वरिष्ठांनी पो.नि. श्रीमती गायत्री जाधव यांना बोलवून माझे तक्रारीवर पुढील कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यानंतर पो.नि. गायत्री जाधव यांनी मला एका कक्षात घेवुन गेले. त्यावेळी पो.नि. गायत्री जाधव यांनी त्यांचे केबिनमध्ये उपस्थित असलेल्या एका इसमाची ओळख सहाय्यक पोलीस आयुक्त, श्री. सरदार नाळे अशी मला करून दिली व ते माझ्या तक्रारीचे अनुषंगाने करण्यात येणाऱ्या पडताळणी व सापळा कारवाई दरम्यान देखरेख अधिकारी म्हणून काम पाहणार असल्याचे सांगितले. पो.नि. गायत्री जाधव यांनी माझे तक्रारीबाबत विचारपुस करून मला माझी तक्रार लेखी देण्यास सांगितले. त्याप्रमाणे माझे स्वहस्ताक्षरात मराठीमध्ये तक्रार अर्ज लिहीला. व त्याखाली मी माझी स्वाक्षरी केली. नमुद तक्रारीमध्ये सहा. शिधावाटप अधिकारी श्री. चंद्रशेखर लोंढे यांनी रू. २०,०००/— इतक्या रक्कमेची लाच मागितली असून त्यावर कारवाई होणेकरिता लेखी तक्रार अर्ज पो.नि. गायत्री जाधव यांचेकडे दिला.

पो.नि. गायत्री जाधव यांनी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात आवश्यक कारवाई पूर्ण करून माझे तक्रारीची पडताळणी करण्याकरिता मी, दोन सरकारी पंच व पोलीस पथक असे दोन पोलीस वाहनातून लोकसेवक यांचे कार्यरत ठिकाणी शिधावाटप कार्यालय, क्र. ३५/ई, मुलुंड पश्चिम, मुंबई येथे जाणेकरिता पथकासह रवाना झालो. आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय येथून वरळी नाका, वरळी–बांद्रा सी लिंकवरून बीकेसीमार्गे पुर्वदुतगती महामार्ग वरून नवघर ब्रिजच्या खालुन डावे वळण घेवुन मुलुंड पश्चिम येथील मुलुंड कोर्टच्या आवारात आलो असता, पो.नि. गायत्री जाधव यांचे सांगण्यावरून वाहन चालकास वाहन कोणासही संशय येणार नाही अशा पध्दतीने थांबविण्यास सांगितले.

त्यांनतर पो.नि. गायत्री जाधव यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करुन पथकातील एका अंमलदाराच्या मार्फतीने माझे शर्टाच्या आतील बनियनला लावुन माझे सोबत पंच श्रीमती डोंबे यांचेसह लोकसेवक सहा. शिधावाटप अधिकारी श्री. चंद्रशेखर लोंढे यांना भेटण्याकरीता शिधावाटप कार्यालय, क्र. ३५/ई, मुलुंड पश्चिम,मुंबई येथे पाठविले असता, तेथे लोकसेवक सहा. शिधावाटप तपासणी अधिकारी श्री. चंद्रशेखर लोंढे यांची भेट झाली. मी लोकसेवक श्री. लोंढे याच्याशी चर्चा करीत असतेवेळी लोकसेवक श्री. लोंढे यांना मी " **सर मी काय म्हणतो. ..तुम्ही मागे बिटच सांगितल होत...आता पटवून टाकू आपण.. नोव्हेंबर पासून आपली बाकी आहे ना....**" असे विचारले असता, लोकसेवक्क श्री. लोंढे यांनी मला " **ऑगस्ट झाल... ऑगस्टचा तर एन्डच होता तो... सप्टेंबरच करायला लागणार तुम्हाला...** " असे बोलुन " **ऑक्टोंबर नोव्हेंबर डिसेंबर जानेवारी फेब्रुवारी...**" असे म्हणाले., त्यावर मी श्री. लोंढे यांना " **पाच महीने ...किती पंधरा देवुन टाकु**" असे बोलळो असता, लोकसेवक श्री. लोंढे मला म्हणाले की, " **हे बघ दयायच असेल तर मग दिल खुलास दे.**" तसेच लोकसेवक श्री. लोढे यांनी त्यांचे मोबाईलमधील कॅलक्युलेटर चालु करून त्यावर मला " **सप्टेंबर धरुन सहा झाले....चार गुनूले पाच...अस आहे...**" त्यावर मी त्यांना "**वीस**" असे म्हणालो असता, लोकसेवक श्री. लोंढे यांनी मला "**असा आहे बघा हिशोब**" असे म्हणाले. त्यावर मी श्री. लोंढे यांना " **वीस मी आणुन देतो**" असे म्हटले असता, श्री. लोंढे यांनी मला "**जाधव साहेबांना भेट जाधव साहेबांना दे**" असे सांगितले. सदरचे संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत झालेले आहे.

पडताळणीच्या वेळी झालेल्या संभाषणाची हकीगत विचारून व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण पंचासमक्ष ऐकले. लोकसेवक सहा. शिधावाटप तपासणी अधिकारी श्री. चंद्रशेखर लोंढे यांनी पडताळणीमध्ये रू. २०,०००/– रक्कमेची लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाल्याने व लोकसेवक सहा. शिधावाटप तपासणी अधिकारी श्री. लोंढे यांनी लाचेची रक्कम जाधव साहेबांना देण्यास सांगितल्याने त्वरीत सापळा कारवाई करण्यात येणार असल्याचे पोनि गायत्री जाधव यांनी सांगितले. त्यांनतर पो.नि. गायत्री जाधव यांनी मला लाच देण्याकरिता रक्कम सोबत आणली आहे किंवा कसे याबाबत विचारणा केली असता, त्यावेळी मी लाचेकरीता लागणारी रक्कम मी माझे बचतीमधुन आणली असल्याचे पो.नि. जाधव याना सांगितले. माझे बचतीतील रूपये वीस हजार रक्कम (रू. ५००/– दराच्या ४० भारतीय चलनी नोटा) पो.नि. गायत्री जाधव यांचे समक्ष सादर केल्या. त्यांनी सापळा पथकातील अंमलदारा मार्फत माझी अंगझडती घेतली व मी लाच म्हणून देण्याकरिता आणलेली रक्कम रू. २०,०००/– वगळून अंगझडतीमध्ये मिळून आलेल्या इतर चीजवस्तू व रक्कम मला परत केली व ती पॅन्टच्या पुढील डाव्या खिशात ठेवण्यास सांगितली.

त्यादरम्यान लोकसेवक श्री. लोढे यांनी त्याचे मोबाईल क्र.८२८६५६७४८९ वरून माझे मोबाईल क्र. ८३६९७९१२५४ वर संपर्क केला असता, नमुद कॉल मी उचलला नाही. त्यानंतर पो.नि. जाधव यांचे आदेशान्वये मी माझे मोबाईल क्र. ८३६९७९१२५४ वरून लोकसेवक श्री. लोंढे यास त्याचे मोबाईल क्र. ८२८६५६७४८९ वर संपर्क केला, त्यावेळेस मी माझे फोनचा स्पिकर ऑन केला. सदरचा कॉल पो.नि. जाधव यांनी त्यांचेकडील डिजीटल

व्हॉईस रेकॉर्डर चालु करून त्यामध्ये रेकॉर्ड केला. कॉल चालु असताना लोकसेवक श्री. लोंढे यांनी माझे दुकान महानगर पालिकेच्या कोणत्या वॉर्डमध्ये याची चौकशी करून फोन कट केला.

त्यानंतर पो.नि. गायत्री जाधव यांनी मला व पंचांना लाचेकरिता दयावयाचे रक्कमेस अँथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही आलेल्या पोलीस वाहनाचे चालक श्री. मोकल यांना बोलावून मला व पंचांना अँथ्रासिन पावडरचे गुणधर्म सांगुन प्रात्यक्षिक सापळा कारवाई नंतर दाखविण्यात येणार असल्याचे मला व पंचाना सांगितले. त्यावेळी त्यांनी गाडीत असलेल्या पेटीतून एक डब्बा बाहेर काढून अँथ्रासीन पावडरचे गुणधर्म मला पंचांसमक्ष समजावुन सांगितले. त्यानंतर लोकसेवक सहा. शिधावाटप अधिकारी श्री. चंद्रशेखर लोंढे यांनी लाचेची रक्कम स्विकारल्या नतर इशारा म्हणुन माझा डावा हात डोक्यावरून वारंवार फिरवण्याचा इशारा करण्यासा सांगितला. त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहात पकडतील असे सांगितले व सापळा कारवाई दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेच्या आवश्यक त्या सुचना मला व पंच श्रीमती डोंबे यांना दिल्या.

त्यानंतर पोलीस वाहनात वाहन चालक श्री. मोकल यांनी पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेस अँथ्रासीन पावडर लावुन सदरची रक्कम माझे पॅन्टच्या उजव्या खिशामध्ये अलगत ठेवली. पो. नि. गायत्री जाधव यांनी यापुढील कारवाईत श्री. मोकल सहभागी असणार नाहीत असे मला व पंचांना सांगितले.

त्यानंतर पो.नि. गायत्री जाधव यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करुन माझे शर्टाच्या आतील बनियनला लावला. त्यानंतर मी व पंच श्रीमती. डोंबे यांचेसह सापळा कारवाईकरीता लोकसेवक यांच्या कार्यालयाच्या ठिकाणी म्हणजे शिधावाटप कार्यालय, क्र. ३५/ई, मुलुंड पश्चिम, मुंबई येथे जाण्यास सांगितले. त्यावरुन मी व पंच श्रीमती डोंबे यांचेसह पायी चालत रवाना झाले.

माझे पाठोपाठ पोलीस पथक देखील शासकीय वाहनातुन उतरून पायी चालत काही अंतर ठेवून लोकसेवकाच्या कार्यालयाच्या बाहेर सापळा लावुन थांबुन राहिले. त्यानंतर मी लोकसेवकाच्या कार्यालयात गेलो असता, तेथे माझी भेट लोकसेवक श्री. लोंढे यांचेसोबत झाली. त्यावेळी मी लोकसेवक श्री. लोंढे यांना **''नमस्कार लोंढे साहेब..दोन मिनिट या** ... असे विचारले असता, लोकसेवक श्री. लोंढे यांनी मला '' **डायरेक्ट काम करून येतो मी ... चार पाच पान आहेत**'' असे सांगितले. त्यानंतर मी लोकसेवक श्री. लोंढे यांना '' **तुम्हाला पाहिजे तर बाहेर या ..... मी गेलो होतो जाधवांकडे...जाधव नव्हता...**'' असे बोललो असता, लोकसेवक श्री. लोंढे हे उठुन त्यांच्या कार्यालयाच्या बाहेर आले असता, मी माझे पॅन्टच्या उजव्या खिश्यातील रु.२०,०००/– लाचेची रक्कम बाहेर काढुन लोकसेवक श्री. लोंढे यांचे समोर केली असता, लोकसेवक श्री. लोंढे यांनी मला '' **उघडयावर नको देवु**'' असे म्हणाले. व हाताच्या इशाऱ्याने नमुद लाचेची रक्कम त्यांनी त्यांच्या पॅन्टच्या पुढील उजव्या खिश्यात ठेवण्याचे खुणवले. त्याप्रमाणे मी त्यांचे पॅन्टच्या उजव्या पुढील बाजुस असलेल्या खिशात नमुद लाचेची रक्कम ठेवली. व मी लोकसेवक श्री. लोंढे यांना **''मोजुन घ्या''** असे सांगितल. त्यावर लोकसेवक श्री. लोंढे यांनी मला **''ठिक आहे''** असे म्हणाले. त्यानंतर मी लागलीच सापळा पथकास दिसेल अशा रितीने लोकसेवकाने लाच रक्कम स्विकारल्याबाबत पुर्व नियोजीत इशारा म्हणुन माझा डावा हात डोक्यावरून वारंवार फिरवुन सापळा पथकास इशारा केला. त्यावर लागलीच सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार यानी सहा. शिधावाटप तपासणी अधिकारी श्री. चंद्रशेखर लोंढे यांस लाच स्विकारताना रंगेहात पकडुन ताब्यात घेतले. त्यानंतर पो.नि. जाधव यांनी माझे शर्टास आतील बनियनला लावलेला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर पथकातील एका अंमलदारांच्या मदतीने काढुन तो बंद करुन स्वतःच्या ताब्यात घेतला.

त्यानंतर हात तपासण्याची व इतर प्राथमिक कारवाई शिधावाटप कार्यालय, क्र. ३५/ई, मुलुंड पश्चिम, मुंबई येथे पुर्ण करण्यात आली. सदर शिधावाटप कार्यालय, क्र. ३५/ई, मुलुंड पश्चिम, मुंबई कार्यालयात पुढील कारवाई करण्याकरिता आवश्यक जागा व विद्युत पुरवठा उपलब्ध नसल्याने तसेच कारोना संसर्गजन्य आजारामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीने पुढील कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, वरळी येथे जावुन करण्यात येणार असल्याचे पो.नि.गायत्री जाधव यांनी सांगितले. त्यानुसार मी, पंच, लोकसेवक सहा. शिधावाटप तपासणी अधिकारी श्री. चंद्रशेखर लोंढे यांचे सह लाचलुचपत कार्यालयात आलो व पुढील कारवाई करण्यात आली.

कार्यालयात आलेवर पोनि गायत्री जाधव यांनी पंचांसमक्ष वर नमुद लोकसेवक यांना त्यांचे पुर्ण नाव व पदा बाबत विचारणा केली असता, त्याने त्याचे नाव श्री. चंद्रशेखर झगाजी लोंढे (सहाय्यक शिधावाटप अधिकारी), वय ५२ वर्षे असे सांगितले.

मी चालवित असलेल्या शिधावाटप दुकानाबाबत लोकसेवक श्री. लोंढे यांच्या कार्यालयात तक्रारी प्राप्त झाल्याने माझे दुकानावर कायदेशीर कारवाई न करण्यासाठी माझेकडे प्रति महिना रू.४०००/- प्रमाणे मागील पाच महिन्याचे एकुण रू.२०,०००/- इतकी लाचेची रक्कमेची मागणी करून ती माझेकडून स्विकारली म्हणुन माझी श्री. चंद्रशेखर झगाजी लोंढे (सहाय्यक शिधावाटप अधिकारी) यांचेविरूध्द कायदेशीर तक्रार आहे. लोकसेवक श्री. चंद्रशेखर झगाजी लोंढे (सहाय्यक शिधावाटप अधिकारी) यांचेशी माझे कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केली असून ती मी वाचून पाहिली असता, मी सांगितल्या प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

( गायत्री जाधव )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ............ तात्काळ

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

—

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ............ —

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ............ —

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

वाजूस नमूद वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीच्या शिधा वाटपाच्या दुकानाबाबत लोकसेवकाच्या कार्यालयात तक्रार प्राप्त झाल्याने फिर्यादीच्या दुकानावर कायदेशीर कारवाई न करण्यासाठी फिर्यादीकडे प्रति महिना रुपये 4000/- प्रमाणे मागील पाच महिन्याचे एकूण रु. 20,000/- इतक्या लाचेच्या रक्कमेची मागणी करून सदरची रक्कम स्विकारताना, आरोपित लोकसेवकास रंगेहाथ पकडले म्हणून गुन्हा नोंद

13. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

पो. नि. गायत्री जाधव, ला.प्र.वि. मुंबई

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ............

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ............, जिल्हा ............, राज्य ............

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)............ Rank............ No............ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to............ (3) Transferred to P. S. ............

District............ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

संपूर्ण नाव Name गायत्री मधुकर जाधव

पदनाम Rank पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. मुंबई

तपासिक अं. चा कोड क्र.

Posting

Code No. of I. O. ............

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख............

1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधिक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**